# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | भूमिका | |
| १ | स्त्री लिखित मराठी कादंबरीचा उदय आणि विकास | १ – ३६ |
| २ | सुरेखा शहा लिखित 'जोहड'ची आशयसूत्रे | ३७ – ७६ |
| ३ | 'जोहड'मधील व्यक्तिरेखा | ७७ – ११३ |
| ४ | 'जोहड'चे रचनाविशेष | ११४ – १४२ |
| ५ | उपसंहार | १४३ – १५३ |
| | परिशिष्टे<br>☐ अभ्यासग्रंथ<br>☐ संदर्भ ग्रंथ सूची<br>☐ नियतकालिक सूची | १५४ – १५५ |

# भूमिका

एम. फिल. लघुप्रबंधासाठी 'सुरेखा शहा लिखित 'जोहड' या कादंबरीचा अभ्यास' हा विषय निवडण्यात आला आहे. १८८५ पर्यंत मराठी कादंबरी फारसी विकसित झाली नव्हती. नंतर मात्र मराठी कादंबरीतून विविध आशय नवनव्या अभिव्यक्तींनी मांडला गेला. यामध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्या उल्लेखनीय स्वरूपाच्या आहेत. १९८०च्या सुमारास लेखन करणाऱ्या लेखिकांपैकी सुरेखा शहा यांची 'जोहड' ही कादंबरी काहीशा वेगळ्या अंगाने प्रवास करताना दिसते. हा विषय प्रेरणा देणारा असल्याने आजच्या परिस्थितीत अभ्यासणे महत्त्वाचे वाटते. सुरेखा शहा यांनी स्त्रियांचे पारंपरिक प्रश्न न मांडता दुष्काळग्रस्त, पाण्याचा अभाव असणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांना विचारप्रवण व कृतीप्रवण करणाऱ्या राजेंद्रसिंहांची चरित कहाणी या कादंबरीत मांडली आहे.

सुरेखा शहा यांच्या 'जोहड' व 'महाराष्ट्राचे जलनायक' या कादंबऱ्या अलिकडे प्रसिद्ध झाल्या आहेत. कथा, कादंबऱ्या, नाटक, एकांकिका, कविता, ललितलेख असे त्यांचे लेखन प्रसिद्ध असले तरी प्रस्तुत अभ्यासासाठी सुरेखा शहांच्या 'जोहड' या कादंबरीची निवड केली आहे.

'जोहड'चा अभ्यास खालील उद्दिष्टे पुढे ठेऊन करण्याचे ठरविले आहे.

१. कादंबरी वाङ्मयाचे स्वरूप व मराठी कादंबरी लेखनामध्ये स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.

२. 'जोहड' या कादंबरीची आशयसूत्रे अभ्यासणे.

३. 'जोहड'मधील व्यक्तिरेखा अभ्यासणे.

४. 'जोहड'चे रचनाविशेष शोधणे.

५. 'जोहड'चे मराठी साहित्यातील स्थान शोधणे.

सुरेखा शहा यांच्या 'जोहड'चा अभ्यास प्रामुख्याने समाजशास्त्रीय अभ्यास पद्धतीने करण्याचे निश्चित केले आहे. त्यादृष्टीने 'जोहड'मधील समाजजीवन, लोकांच्या जगण्याच्या धारणा अभ्यासून या कादंबरीचे निवेदन, रचनाविशेष यांचाही शोध घेण्यात येईल.